

दैनिक
सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •



• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २२८ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.२४ जून २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

दरवर्षी पाच हजार नवीन बसेस एसटी महामंडळाच्या ताफ्यात येणार: एसटी महामंडळाची श्वेतपत्रिका जाहीर

आर्थिक संकटातून बाहेर काढणार-परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई (वृत्तसंस्था)-राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषद घेत एसटी महामंडळाच्या श्वेतपत्रिकेबद्दल माहिती दिली आहे. तसेच एसटी महामंडळाला आर्थिक संकटातून वाचवणार असल्याचे आश्वासन देखील सरनाईक यांनी दिले आहे. दर वर्षाला किमान १० हजार बसेसची मागणी देखील त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली असल्याचे त्यांनी सांगितले आहे.पत्रकार परिषदेत बोलताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, दर वर्षाला १० हजार बसेस एसटी महामंडळाच्या ताब्यात आल्या तर जुन्या झालेल्या बसेस पुढल्या ५ वर्षात बाहेर काढता येतील आणि २५-३० हजार बसेसच्या जोरावर आपण चांगल्या प्रकारचे काम पुढे करू शकू, असा प्रस्ताव मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्याकडे मांडला आहे. या संकल्पनेला सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून दर वर्षाला ५ हजार बसेस देऊ असे अश्वासन देण्यात आले आहे.

एसटी महामंडळाची श्वेत पत्रिका काढण्यात आली आहे. या एसटी महामंडळाच्या खर्च आणि उत्पन्नाचा जमाखर्च मांडण्यात आला आहे. एसटी महामंडळाच्या ताफ्यात लवकरच ५३०० इलेक्ट्रीक बसेसचा समावेश करण्यात येणार आहे. सवलतधारी प्रवाशांसाठी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड योजना राबवण्यात येणार आहे. तिकीटांसाठी इटीआयएम, ओआरएस प्रकल्प राबवणे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आणि मालमत्तेच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा बसवणे, अपघातांचे प्रमाण कमी करणे, कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी विविध कल्याणकारी योजना राबवण्यात येणार आहेत. तसेच लांबचा प्रवास करणाऱ्या विना सवलतधारी प्रवाशांना तिकीटदरात सवलत देण्याचीही योजना एसटी महामंडळाच्या विचाराधीन असल्याचे या श्वेतपत्रिकेत म्हटले आहे.

महामंडळाच्या ताफ्यात भाडेतत्वावरील हायटेक व्होल्वो बसेसचा समावेश करणे. महामंडळाच्या जागांवर इंधर पुरवठादार कंपन्यांकडून महसुली भागीदारी तत्वावर खाजगी वाहनांसाठी किरकोळ डिझेल आणि पेट्रोल पंप सुरु करणे. महामंडळाच्या जागांचा बीओटी-पीपीपी तत्वावर विकास करणे, तसेच महामंडळाच्या ताफ्यात ५ हजार एलएनजी इंधनाच्या बसेसचा समावेश करणे, महामंडळाच्या ताफ्यात १ हजार सीएनजी इंधनाच्या बसेसचा अंतर्भाव करणे, या गोष्टींचा श्वेतपत्रिकेत समावेश आहे.



एसटी महामंडळ हा लोकांचा विश्वास

पुढे बोलताना प्रताप सरनाईक म्हणाले, एसटी महामंडळ हा लोकांचा विश्वास आहे, एसटीवर लोकांचा विश्वास आहे, त्यामुळे ही लालपरी सर्वसामन्यांच्या मनात बसली आहे. स्वत:च्या मोठ्या गाड्या असून सुद्धा एसटीने प्रवास करणारी मंडळी या महाराष्ट्रात आहेत. त्यामुळे एसटी महामंडळाची आजची जी स्थिती आहे ती तुमच्यासमोर मांडली आहे आणि निश्चितपणे माझ्या कार्यकाळात, सगळ्या या अधिकाऱ्यांना घेऊन एसटी महामंडळ मी ओव्हर कॉन्फिडंसमध्ये असे म्हणणार नाही की फायद्यात घेऊन जाईल, पण तोट्यात नक्कीच घेऊन जाणार नाही, असा विश्वास मला आहे.

एसटी महामंडळ आर्थिक संकटातून आम्ही बाहेर काढू

दूसरा असा निर्णय मी घेतलेला होता की, एसटी महामंडळाच्या ताफ्यात माझ्या कार्यकाळात मी भाडेतत्वावर बसेस घेणार नाही आणि त्यामुळे भाडेतत्वावर बस ही केवळ ठेकेदाराच्या फायद्यासाठी होते असा आत्तापर्यंतचा इतिहास झालेला आहे. त्यामुळे भाडेतत्त्वावर घेण्यापेक्षा माझ्या याच चालकाला, वाहकाला घेऊन मी एसटी महामंडळ पुढे नेण्याचा प्रयत्न करेल. गरजच पडली तर २०१९ साली काही भरती प्रक्रिया थांबली होती. आता भविष्यात देखील गरज भासली तर भरती प्रक्रिया करता येईल. परंतु, एसटी महामंडळ हे आर्थिक संकटातून आम्ही बाहेर काढू.

सांगली हादरली! नीट परीक्षेतील कमी गुणा मुळे वडिलांच्या मारहाणीने मुलगी मृत्युमुखी

नेलकरंजी येथे घडलेल्या घटनेने राज्यभर हळहळ व्यक्त

सांगली । प्रतिनिधी

नीट परीक्षा म्हणजेच भविष्यात डॉक्टर होण्यासाठीचं एक मोठं पाऊल.मात्र या परीक्षेत थोडे कमी गुण मिळाल्यामुळे एका मुलीला आपला जीवच गमवावा लागला आहे. सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील नेलकरंजी गावात घडलेल्या या हृदयद्रावक घटनेने अवघं राज्य हादरून गेलं आहे.

नेलकरंजी येथील साधना भोसले (वय १८), विज्ञान शाखेतील विद्यार्थिनी, डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगून होती. दहावीत ९५ टक्के गुण मिळवून चमकलेली साधना नीट परीक्षेसाठी कष्टाने तयारी करत होती. मात्र चाचणी परीक्षेत तिला अपेक्षित गुण न मिळाल्याने वडिलांनी जे स्थानिक खासगी शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत आपल्याच मुलीला जात्याच्या लाकडी खुंट्याने बेदम मारहाण केली.



शुक्रवारी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास साधनेला लाकडी खुंट्याने मारहाण करण्यात आली. या मारहाणीने साधना गंभीर जखमी झाली, मात्र वडिलांनी तिच्याकडे कोणतेही लक्ष दिले नाही. दुसऱ्या दिवशी वडील शाळेत 'योग दिन' साजरा करण्यास गेले आणि घरी आल्यानंतर साधना बेशुद्ध अवस्थेत असल्याचे लक्षात आले. तिला रुग्णालयात नेण्यात आले, पण उपचार सुरू होण्यापूर्वीच साधनेचा मृत्यू झाला.

घटनेनंतर साधनेची आई प्रीती भोसले यांनी आटपाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी आरोपी वडील धोंडीराम भोसले यांना रविवारी अटक केली आहे.

साधना ही अत्यंत हुशार आणि कष्टाळू विद्यार्थिनी होती. दहावीमध्ये ९५ टक्के गुण मिळवणारी ही मुलगी नीट परीक्षेसाठी जिद्दीने तयारी करत होती. अशा परिस्थितीत एका चाचणी परीक्षेतील थोडे कमी गुणच तिच्या मृत्यूस कारण ठरले. या घटनेने शिक्षणाची गुणवत्ता, गुणांची चढाओढ आणि अपयश पचवण्याची आपली मानसिकता या सगळ्यांवरच गहन प्रश्नचिन्ह उभे केले आहे.नेलकरंजीतील या दुर्दैवी घटनेने केवळ सांगलीच नव्हे, तर अवघे राज्यच सुन्न झाले आहे. शिक्षणाचा उद्देश घडविणे आहे, घालविणे नव्हे हे लक्षात घेण्याचीच ही वेळ आहे.

मापात 'पाप' आणि किंमतीत 'घात'! ५२ रुपयांचे श्रीखंड पडले तब्बल १५ हजारांत;ग्राहकाच्या सहनशीलतेचा अंत आता

नियंत्रण संस्था भ्रष्टाचाराच्या विळख्यात!

राज्य सरकारकडे वजनमापे नियंत्रण यंत्रणा आहे, मात्र या यंत्रणेमध्येच दुकानदाऱ्यांशी अर्थपूर्ण साटेलोटे आहे. कारवाया दाखवण्यासाठीच केवळ कागदोपत्री प्रकरणे दाखल होतात, तर वास्तविक नियंत्रणाचा लवलेशही राहिला नाही.

धुळे । उमाकांत अहिरराव

व्यवसाय नीतिमत्तेवर उभा राहतो, तरच त्यात 'बरकत' येते, असा विश्वास आहे. मात्र, अनेक दुकानदारांच्या मनातून ही नीतीमत्ता लोप पावत आहे. मोजक्या पैशांत विकणाऱ्या वस्तूंच्याही लुबाडणुकीचे डाव रचले जात आहेत. साक्री तालुक्यातील दिघावे येथील आशापुरी इलेक्ट्रॉनिक्स अँड कोल्ड्रिंक्स या दुकानाने तर कहरच केला आहे अवघ्या ५२ रुपयांच्या श्रीखंडावर 'कुलिंग चार्जेस' म्हणून ८ रुपये जास्त मागून ग्राहकाचा संयमाचा अंत घडवून आणला. अखेर या लुबाडणुकीने दुकानदाराला तब्बल १५,००० रुपये दंडाच्या रूपात मोजावे लागले आहे. 'मापात पाप' आणि 'किंमतीत घात' करणाऱ्या व्यापाऱ्यांसाठी हा निर्णय खोल इशारा आहे.

दिघावे येथील या दुकानदाराने श्रीखंडाच्या डब्यावर एमआरपी ५२ रुपये असूनही 'कुलिंग चार्जेस' म्हणून ग्राहक कैलास भदाणे यांच्याकडून ८ रुपये जादा मागितले. कैलास भदाणे यांनी हे पैसे देण्यास स्पष्ट नकार दिला. वाद वाढतच गेला आणि अखेर प्रकरण थेट ग्राहक मंचापर्यंत पोहोचले.

ग्राहक मंचाचा झणझणीत निर्णय!

ॲड. चंद्रकांत येशीराव व ॲड. धनश्री येशीराव यांनी ग्राहकाच्या बाजूने जोरदार युक्तिवाद केला. ग्राहक मंचाच्या अध्यक्षा नीता देसाई व सदस्या ॲड. रसिका निकुंभ यांनी स्पष्ट निर्देश दिले की एमआरपीपेक्षा जास्त किंमत घेणे हे कायद्याने गुन्हा आहे. त्यामुळे दुकानदाराला घेतलेल्या ८ रुपयांच्या अवैध वसुलीवर ८% व्याजासह रक्कम परत करण्याचा आदेश दिला आहे. त्यासोबतच मानसिक त्रासापोटी १०,००० रुपये, तर खटल्याचा खर्च म्हणून ५,००० रुपये असा एकूण १५,००० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

दिघाव्यातील श्रीखंड प्रकरणाचा इशारा!

पैशासाठी केलेली अनिती कुठे ना कुठे भरून निघतेच, हे या प्रकरणातून पुन्हा स्पष्ट झाले आहे. ग्राहक आता जागरूक आहे आणि त्याचा आवाज न्यायालयातही बुलंद आहे. दुकानदारहो, लक्षात घ्या ग्राहक म्हणजेच देव आहे. त्याचा सन्मान करा, अन्यथा तोच तुम्हाला दंड देईल आणि त्या श्रीखंडासोबतच तुमचं भविष्यही वितळवेल!

पोंभुर्णा तालुक्यात वीजपुरवठा सुरळीत करा,अन्यथा जनआंदोलन-आ.मुनगंटीवार

वीज वितरण व्यवस्थेतील दिरंगाईमुळे नागरिक हैरान, प्रशासनाला लेखी निवेदन

चंद्रपूर । प्रतिनिधी

पोंभुर्णा तालुक्यात वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडामुळे नागरिक हैरान झाले असून, शेती, शिक्षण, आरोग्य सुविधा, उद्योगधंदे आणि दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आणि आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी वीज वितरण कंपनीच्या कार्यशैलीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांनी जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन सादर करून तातडीने आवश्यक सुधारणा करण्याची मागणी केली आहे.

आमदार मुनगंटीवार यांनी निवेदनात म्हटले आहे, वीज वितरण यंत्रणेतील नियोजनशून्यता आणि उदासीनतेमुळे जनतेचे प्रचंड नुकसान होत आहे. शाळा-महाविद्यालयांच्या प्रवेश प्रक्रियेसह इतर शासकीय कामकाजात अडथळे येत आहेत. शेतकरी हैराण झाले आहेत, तर लघुउद्योजकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. वेळेवर ट्रान्सफॉर्मर बदलले जात नाहीत, दुरुस्तीला विलंब होतो आणि वीज गेल्यानंतर पुन्हा सुरळीत होण्यासाठी बराच अवधी लागतो. या संदर्भात अनेक नागरिकांनी माझ्याकडे



तक्रारी केल्या आहेत.जर या परिस्थितीत तातडीने बदल घडवून आणले नाहीत आणि वीज वितरण व्यवस्थेमध्ये आवश्यक सुधारणा केल्या नाहीत तर भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून वीज वितरण कंपनीविरुद्ध जनआंदोलन उभारले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. तसेच, प्रशासनाने जनतेच्या भावना समजून घेत तत्काळ उपाययोजना सुरू कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे.



कुंभकर्णाच्या झोपेतून महापालिका कधी जागे होणार?

'ढोल बजाओ' आंदोलनातून राष्ट्रवादीचा सवाल

धुळे । प्रतिनिधी

पावसाळ्याचा महिना उलटून जात असूनही धुळे महापालिकेने अद्याप नालेसफाईसारखी मूलभूत कामे सुरू केलेली नाहीत. जळगाव, नाशिक, मुंबई या महानगरांपेक्षा जास्त घरपट्टी वसूल करूनही नागरिकांना मिळणाऱ्या सुविधा शून्यच राहिल्याचा आरोप करीत राष्ट्रवादी काँग्रेसने 'ढोल बजाओ' आंदोलनाच्या माध्यमातून महापालिका प्रशासनास जाब विचारला आहे.दुर्गंधीयुक्त नाले, गढूळ पाणी आणि साथरोगाचा वाढता धोका लक्षात घेत नागरिकांमध्ये तीव्र अस्वस्थता आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाच्या निष्क्रियतेचे प्रतीक म्हणून कुंभकर्णाचा पुतळा लोटगाडीतून महापालिका प्रवेशद्वारासमोर ठेवण्यात आला. ढोलाच्या कडक गजरात प्रशासनाच्या सुस्त कारभाराचा निषेध करत आंदोलनकर्त्यांनी महापालिका प्रशासनास आम्ही कर भरतो, मग सुविधा का नाहीत.असा जळजळीत सवाल केला.

माजी आमदार प्रा. शरद पाटील यांच्या नेतृत्वाखालील या आंदोलनात नागरिक, राष्ट्रवादीचे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या आंदोलनाच्या निमित्ताने प्रशासनास निवेदन सादर करण्यात आले



आहे. या निवेदनात जास्तीचे घरपट्टीचे दर तातडीने कमी करणे, नागरिकांना नियमित व स्वच्छ पाणीपुरवठा करणे, शहरातील नाल्यांची सफाई त्वरित पूर्ण करणे, साथींचा फैलाव रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविणे आणि रस्त्यांवरील प्रकाश व्यवस्था सुस्थितीत आणण्याची मागणी करण्यात आली आहे.

जर प्रशासनाने या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही तर भविष्यात जनआंदोलनाचा व्यापक लढा उभारू,असा इशाराही या वेळी देण्यात आला. ढोल बजाओ आंदोलनाच्या या एल्गारने प्रशासनाच्या ढिम्म कारभाराचा पर्दाफाश केला असून, नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत कधी होईल याचा सवाल उपस्थित केला आहे.

गंगाखेडच्या संत जनाबाई महाविद्यालयाचा जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत दमदार सहभाग

गंगाखेड । प्रतिनिधी

महाराष्ट्र बॅडमिंटन संघटनेच्या मान्यतेने परभणी जिल्हा बॅडमिंटन संघटनेतर्फे आयोजित जिल्हास्तरीय अजिंक्यपद व राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धा २०२५ या स्पर्धेत गंगाखेड तालुक्यातील फायटर्स ग्रुप स्पोर्ट्स अकॅडमीअंतर्गत गंगाखेड तालुका बॅडमिंटन संघटनेद्वारे प्रथमच संत जनाबाई महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी दमदार कामगिरी सादर केली आहे. २० व २१ जून रोजी परभणी येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या बॅडमिंटन हॉलमध्ये पार पडलेल्या या स्पर्धेत महाविद्यालयाचे क्रीडाप्राध्यापक चैतन्य पाळवदे यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी आपली गुणवत्ता दाखवून दिली. विशेष म्हणजे, प्रा. चैतन्य पाळवदे यांनी प्रशिक्षकासह खेळाडू म्हणूनही स्पर्धेत आपला सहभाग नोंदवून उल्लेखनीय कामगिरी केली.

१७ वर्षांखालील मुलींच्या गटात समिक्षा अवचार, १९ वर्षांखालील मुलांच्या गटात शंतनू साळवे, रोहित जंगले, कृष्णा मुरकुटे, १९ वर्षांवरील मुलींमध्ये मधुरा भेंडेकर तर प्रौढ पुरुष गटात प्रा. चैतन्य पाळवदे, गणेश करवे आणि धनराज पाळवदे या खेळाडूंनी दमदार खेळ करून आपली गुणवत्ता सिद्ध केली.या दमदार सहभागाबद्दल महाविद्यालयाचे संस्थाचालक, प्राचार्य, उपप्राचार्य, क्रीडा विभाग प्रमुख, सर्व प्राध्यापकवृंद तसेच गंगाखेड तालुका बॅडमिंटन संघटनेचे अध्यक्ष प्रल्हादराव मुरकुटे व मदनराज सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष मदन कातकडे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे आणि त्यांच्या भविष्यातील राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्पर्धांतील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.गंगाखेड तालुक्यात आमदार डॉ. रत्नाकरराव गुट्टे यांच्या प्रयत्नांतून मंजूर झालेल्या शासकीय क्रीडा संकुलाचे काम सध्या वेगाने सुरू आहे. त्यात समाविष्ट बॅडमिंटन हॉलचे काम विशेष गुणवत्तेसह प्रगतीपथावर आहे. या स्पर्धेद्वारे गंगाखेडमधील ग्रामीण विद्यार्थ्यांनी बॅडमिंटनसारख्या खेळात आपली ओळख निर्माण करून भविष्यात राज्य व राष्ट्रीय पातळीवरील सहभागाची भक्कम पायाभरणी केली आहे. गंगाखेड तालुक्यातून घडणाऱ्या या क्रीडा क्रांतीत संत जनाबाई महाविद्यालयाचा सहभाग हा ग्रामीण क्रीडाक्षेत्रातील एक प्रेरणादायी पाऊल ठरले आहे.



निकणे गावाचा मृत्युपूल : १२ गावांचा जिवघेणा प्रवास कधी थांबणार?

पालघर । प्रतिनिधी

डहाणू तालुक्यातील निकणे गावाचा अंदाजे ५० वर्षे जुना पूल मृत्यूपूलच ठरतो आहे. निकणे सह घाटाळपाडा, देसकपाडा, सुतारपाडा, गावठणपाडा, दाभीपाडा, इभाडपाडा, वधना-वाकीपाडा, उर्से, म्हसाड, दाभोन सगदेव आणि पेठ या १२ गावांचा आधार असलेला हा पूल प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे आज जर्जर अवस्थेत आहे.पावसाळ्यात नदीला पूर आला की सलग ५ तासांहून अधिक काळ या गावांचा संपर्क पूर्णपणे तुटतो. या काळात रुग्णालयात जावू न शकणारे रुग्ण, गरोदर माता, शाळकरी मुले आणि वृद्ध नागरिक जिवावर उदार होऊन राहतात. साधारण १९७५ साली बांधलेल्या या पुलाच्या लाकडी फरशा सडलेल्या आहेत, गटारींचा अभाव आहे, तर पुलाचा लोखंडी ढाचा प्रत्येक वाहनाच्या वजनाने हलतो. या अवस्थेतूनच स्थानिक नागरिकांना मृत्युला आव्हान देत दररोजचा प्रवास करावा लागत आहे.

गेल्या अनेक वर्षांत या पुलावरून दुचाकी, बैलगाडी, ट्रॅक्टर आणि इतर वाहनांच्या अनेक दुर्घटना घडल्या आहेत. काही



नागरिकांचा मृत्यूसुद्धा या पुलामुळे झाला आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे या भागातील ग्रामस्थांचा संयम आता संपत चालला आहे.ग्रामस्थांचा सवाल आहे की प्रशासनाची झोप कधी उडणार? कधी या १२ गावांचा जिवघेणा प्रवास थांबणार? मृत्यूपुलाच्या या कहाणीने आता प्रशासनाच्या सहानुभूतीला नव्हे तर कृतीला हाक दिली आहे.

“ जेव्हा पाऊस येतो तेव्हा या पुलाचा उपयोगच होत नाही. वाहनांची वाहतूक बंद होऊन गावकऱ्यांना आपत्कालीन परिस्थितीत प्रचंड त्रास सहन करावा लागतो. प्रशासनाने या समस्येकडे तातडीने लक्ष द्यायला हवे
सुधीर घाटाळ, ग्रामस्थ

“ वाहतुकीची साधने जाऊ शकत नसल्याने आजारी रुग्णांना रुग्णालयात पोहोचविणेच अशक्य होते. या पुलाचा तातडीने पुनर्निर्माण करणे गरजेचे आहे, अन्यथा भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याचा धोका आहे.
किशोर चिपाटे, नागरिक

‘विठ्ठल नामाचा जयघोष’ : गंगाखेडहून पंढरपूरकडे संत जनाबाईंची पालखी रवाना



गंगाखेड । प्रतिनिधी

धरिला पंढरीचा चोर या आपल्या अभंगातून विठुरायाचीच चोरी करून त्याला हृदयात बंदिस्त करणाऱ्या श्री संत जनाबाई यांच्या स्मरणार्थ गंगाखेड येथून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पालखी सोहळा मोठ्या भक्तिभावाने पंढरपूरकडे मार्गस्थ झाला.

१९७२ पासून सुरू झालेला हा पालखी सोहळा या वर्षी आपले ५३ वे वर्ष साजरे करत आहे. गंगाखेड येथील वारकरी मंडळींनी अर्धशतकाहून अधिक काळ टिकवून ठेवलेली ही दिंडी परंपरा विठ्ठल नामाचा जयघोष करत २३ जून रोजी पंढरपूरकडे रवाना झाली.गंगाखेड येथे जन्मलेल्या श्री संत जनाबाई या विठुरायाच्या लाडक्या भक्त म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या अलौकिक भक्तीमुळेच भगवंत विठ्ठल प्रत्येक वेळी त्यांच्या सहकार्याला धावून आले. म्हणूनच या पालखीतून त्यांच्या पुण्य स्मृतींचे जतन केले जाते.दिंडीमध्ये गंगाखेड व परिसरातील गावांमधून आलेले कीर्तनकार, मृदंगाचार्य, टाळकरी, झेंडेकरी तसेच इतर सेवा करणारे वारकरी सहभागी झाले होते. फुलांनी सुशोभित रथात विराजमान संत जनाबाईंची पालखी मंदिर परिसरातून मार्गस्थ झाली. दिलकश चौक, होळकर चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, महाराणा चौक व परळी मार्गे ढोल-ताशांच्या गजरात, विठुरायाचा जयघोष करत वारकरी पंढरपूरकडे रवाना झाले.

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे निवेदन

श्री साईबाबा महाविद्यालयात प्राचार्यपद शासन निर्णयानुसारच नियुक्त करावे : प्रशांत वाघचौरे

शिर्डी । प्रतिनिधी

श्री साईबाबा वरिष्ठ महाविद्यालयात प्राचार्यपद हे अत्यंत महत्त्वाचे आणि जबाबदारीचे आहे. या पदावर नियुक्ती करताना शासन निर्णय क्रमांक नियुक्ती २०११/प्रक्रिया ३४४/११ माशी ५ मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ मार्च २०१२ मधील नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे शिर्डी शहर अध्यक्ष प्रशांत वाघचौरे यांनी केली आहे. प्राचार्यपदाचा कार्यभार ज्येष्ठतेनुसारच दिल्यास शिक्षणाचा दर्जा नक्कीच उंचावेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. या नियमांकडे दुर्लक्ष केल्यास महाराष्ट्र



नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्यावतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करता वरिष्ठ महाविद्यालयातील साधने आणि साहित्य स्थानिक तसेच गरजू विद्यार्थ्यांसाठी उपयोगी आहेत, त्यामुळे या साधनसामग्रीचा पूर्ण उपयोग विद्यार्थ्यांना होईल, असे मत व्यक्त करण्यात आले आहे.यासंदर्भात श्री साईबाबा महाविद्यालयाच्या प्रशासनाने शासन निर्णयानुसारच प्राचार्यपदावर नियुक्ती करावी, या मागणीचे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्यावतीने श्री साईबाबा संस्थान शिर्डीचे उपकार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र विद्यार्थी सेनेचे शिर्डी शहर अध्यक्ष प्रशांत वाघचौरे, शिर्डी मनसेचे शहराध्यक्ष लक्ष्मण अण्णा कोतकर, अभिषेक पोपळघट, चेतन झिंजाड, रवी कुसळकर, गौरव भालेराव, ऋषी धीवर, प्रवीण आसणे यांच्यासह विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कायमस्वरूपी शिक्षक न दिल्यास ३० जून रोजी प्रकल्प कार्यालयासमोरच शाळा भरवणार-एकनाथ दरोडा

जव्हार । जितेंद्र मोरघा

जव्हार प्रकल्पांतर्गत शासकीय माध्यमिक आश्रम शाळा झाप येथे शिक्षकांचा गंभीर तुटवडा असून गेल्या दोन वर्षांपासून या शाळेत मुख्याध्यापक पदासह माध्यमिक विभागासाठी एकही कायमस्वरूपी शिक्षक नाही. प्राथमिक विभागातदेखील केवळ दोनच कायमस्वरूपी शिक्षक कार्यरत असून इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतचे तब्बल ६४९ विद्यार्थी (मुलं ३४१, मुली ३०८) या शिक्षकांच्या भरवशावरच शिक्षण घेत आहेत.गेल्या दोन वर्षांपासून मुख्याध्यापक पदाचा कार्यभार प्राथमिक शिक्षकाकडेच आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. ही बाब शासनाच्या निदर्शनास अनेकदा आणूनही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, असा आरोप




ग्रामपंचायत झापकडून करण्यात आला आहे.यासंदर्भात सरपंच एकनाथ दरोडा यांनी इशारा दिला आहे की, जर आठवड्याभरात शासकीय आश्रम शाळा झाप येथे कायमस्वरूपी मुख्याध्यापक व शिक्षक नेमले गेले नाहीत तर येत्या सोमवार, दि. ३० जून रोजी विद्यार्थ्यांना घेऊन थेट प्रकल्प कार्यालयासमोरच शाळा भरवण्यात येईल.

शासकीय आश्रम शाळा झापला कायमस्वरूपी मुख्याध्यापक व शिक्षक आठ दिवसांत द्यावेत, अन्यथा ३० जून रोजी प्रकल्प कार्यालयात विद्यार्थ्यांना घेऊन शाळा भरवणार आहे.
– एकनाथ दरोडा, सरपंच, झाप ग्रामपंचायत

हगणदारी तात्काळ बंद करा अन्यथा टमरेल आंदोलनाचा इशारा

प्रभाग १३ व १४ मधील नागरिकांची ढाणकी नगरपंचायतला धडक



शहरी भागापासून ग्रामीण भागापर्यंत हगणदारीमुक्त अभियान केवळ कागदावरच राहिले आहे. या मोहिमेचा योग्यप्रकारे अंमल होत नसल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागतो आहे. शासनाने किमान या गंभीर परिस्थितीकडे लक्ष द्यावे, अन्यथा ही मोहीम केवळ कागदोपत्रीच राहणार आहे. – सुमित बुरसे, सामाजिक कार्यकर्ते, ढाणकी

उमरखेड । प्रतिनिधी

प्रभाग क्रमांक १४ येथे अनेक वर्षांपासून सुरू असलेली हगणदारी आता नागरिकांच्या सहनशीलतेचा कडेलोट गाठू लागली आहे. या भागात घाणीचे साम्राज्य पसरले असून दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. स्थानिक महिला उघड्यावरच शौचास जात असल्याने परिसरात आरोग्याचा गंभीर प्रश्न उद्भवला आहे.

रविवार, दिनांक २३ जून रोजी नागरिकांनी नगरपंचायत प्रशासनाला निवेदन सादर केले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग क्रमांक १४ येथे शहराच्या मध्यवर्ती भागातच हगणदारी सुरू आहे. अनेक वेळा लेखी व तोंडी तक्रारी करूनही प्रशासनाने या समस्येकडे दुर्लक्ष केले आहे. एकीकडे शासन हगणदारीमुक्त गाव अभियान राबवते आहे, तर दुसरीकडे ढाणकी नगरपंचायतच या मोहिमेला हरताळ फासण्याचे काम करीत आहे.यासंदर्भात प्रशासनाला १५ दिवसांचा अल्टीमेटम देण्यात आला आहे. या कालावधीत हगणदारी बंद करून परिसराचे सुशोभीकरण न केल्यास नागरिक नगरपंचायत समोरच टमरेल आंदोलन करतील, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.यावेळी सुमित बुरसे, गणेश काटोले, आकाश मुरकुलवाड, बालाजी अलकटवार, माजी नगरसेविका मंदाकिनी नंदनवार, प्रशांत उर्फ जॉन्टी विणकरे, सरिता बुरसे, अनिता गुंडेवार, लक्ष्मीबाई याटेवाड, ललिता गुंडेवार, सुमित्राबाई ढेंगे, अनुसया काटोले, शुभांगी नंदनवार, अनुराधा ताटीकुंडलवाड, शोभा ढेंगे, नागेश लकडे, अभिजीत कत्तलवाड, ओंकार ढेंगे गोलू मुनेश्वर, शुभम गाडगे, आकाश कत्तलवाड, विलास चिट्टेवाड, शुभम ताटीकुंडलवाड, समाधान राऊत यांच्यासह शेकडो नागरिक उपस्थित होते.

चिंचणीमध्ये जेईई मेंटॉरशिप सत्र उत्साहात संपन्न

आयआयटी दिल्लीतील जयेंद्र बिऱ्हाडे यांचे विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन



पालघर । प्रतिनिधी

चिंचणी-तारापूर एज्युकेशन सोसायटीच्या मोतीलाल कानजी ज्युनियर कॉलेजमध्ये जेईई (ऋ) मेंटॉरशिप सत्र २०२५-२६ उत्साहात पार पडले. या सत्रात आयआयटी दिल्लीमध्ये शिक्षण घेत असलेले आणि महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी जयेंद्र बिऱ्हाडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना जेईई मेन्स व ॲडव्हान्स परीक्षा संदर्भात सखोल मार्गदर्शन केले.जयेंद्र बिऱ्हाडे यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांमधील गुणवत्ता, मेहनत आणि चिकाटी असूनही योग्य माहिती व दिशादर्शनाच्या अभावामुळे जेईई परीक्षेत अपयश येत असल्याचे निदर्शनास आणून दिले. योग्य नियोजन, सातत्यपूर्ण सराव, वेळेचे व्यवस्थापन आणि आत्मविश्वासाच्या जोरावर परीक्षा यशस्वीरीत्या पार करता येते, असा सल्लाही त्यांनी दिला.

सत्रादरम्यान आय. व्ही. पी. स्मार्ट क्लासरूममध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधून सीबीएसई व राज्य मंडळाच्या अभ्यासक्रमावर तुलनात्मक चर्चा करण्यात आली. अभ्यासाची साधने, सकारात्मक दृष्टीकोन आणि योग्य मेंटॉर निवडीचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

प्रा. संजय बहारे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. प्रा. मनोज सोनावणे यांनी जयेंद्र बिऱ्हाडे यांचा परिचय करून दिला तर प्रा. डॉ. चंद्रकेतू पामाळे यांनी उपस्थितांचे व अतिथींचे आभार मानले.या वेळी उपप्राचार्य प्रा. संगीता चूरी, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या घडणीत माजी विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चेअरमन रजनीकांत श्रॉफ होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी सांगितले की, जयेंद्रसारखे यशस्वी माजी विद्यार्थी मार्गदर्शक म्हणून समोर आले पाहिजेत. कनिष्ठ महाविद्यालय आणि माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्यातून सक्षम पिढ्यांची निर्मिती होईल. चांगले अभियंते घडविण्यासोबतच चांगले नागरिक घडवून देशाच्या समस्यांवर उपाय शोधण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना

महाविद्यालयाचे प्राचार्य महेश कुमार रावते यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मेंटॉरशिप सत्र अत्यंत उपयोगी असल्याचे सांगून अशा कार्यक्रमांचा विद्यार्थ्यांना फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला.

सर्वांसाठी योग - तंदुरुस्तीची नवी दिशा

वरोरा । प्रतिनिधी

आनंदवन वरोरा संचलित आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाच्या कृषीदूतांनी २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा केला. या उपक्रमास गावकऱ्यांचे उत्स्फूर्त सहकार्य लाभले. कृषीदूतांनी गावकऱ्यांना योगाचे महत्त्व व फायदे समजावून सांगितले, तर लहानग्यांपासून ते जेष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनीच या कार्यक्रमात सहभाग घेतला.

योग हा एक प्राचीन भारतीय मानसिक, शारीरिक आणि आध्यात्मिक सराव आहे, ज्याचा उद्देश शरीर आणि मनामध्ये समतोल साधणे आहे. योग हा शब्द संस्कृतमधील युज या शब्दापासून आला आहे, ज्याचा अर्थ एकत्र येणे किंवा एकरूप होणे असा आहे.या उपक्रमात कृषीदूत वैभव शेडामे, आदर्श पांडेय, पंकज घुगुस्कर, करण बघेले, सौरभ भांडेकर, तेजस गाडेकर, हर्षल आत्राम यांनी सक्रिय भूमिका निभावली. आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. पोतदार, ग्रामीण कृषी कार्यानुभव प्रभारी डॉ. आर. व्ही. महाजन, कार्यक्रम समन्वयक राहुल तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.

बोगस बियाणे विकणाऱ्या कंपन्यांवर तातडीने कारवाई करा-आ.राजेश बकाने

जिल्हा कृषी अधिकाऱ्यांना झडकारले, शेतकऱ्यांच्या नुकसानीबद्दल प्रशासनाला जाब

वर्धा । प्रतिनिधी

शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या बोगस व उगवणक्षमता नसलेल्या सोयाबीन बियाण्यांच्या विक्रीमुळे वर्धा जिल्ह्यातील शेतकरी हैराण झाले आहेत. या गंभीर विषयावर देवळी-पुलगाव मतदारसंघाचे आमदार राजेश बकाने यांनी थेट जिल्हा कृषी अधिकारी शंकर तोटावार यांना पालकमंत्री पंकज भोयर, जिल्हाधिकारी वर्धा, तसेच उपस्थित आमदार समीर कुणावार व सुमीत वानखेडे यांच्या समोरच कडक शब्दांत जाब विचारला.आमदार बकाने यांनी बैठकीत शेतकऱ्यांच्या तक्रारींचे दाखले सादर करून बियाण्याचे उगम नमुने दाखवले. त्यांनी स्पष्टपणे सांगितले, बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अशा कंपन्यांना वाचवण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही. संबंधित कंपन्यांविरुद्ध तातडीने कडक कारवाई केली जावी.

आमदार बकाने यांनी प्रशासनाला इशारा दिला की, जर दोषींविरुद्ध लवकरच कारवाई झाली नाही तर शेतकऱ्यांसह रस्त्यावर उतरून आंदोलन छेडले जाईल. कृषी विभागाच्या निष्क्रियतेबद्दल नाराजी व्यक्त करत त्यांनी तातडीने सखोल चौकशी सुरू करून दोषींना निलंबित करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली.पालकमंत्री पंकज भोयर यांनी या मुद्द्याचे गांभीर्य लक्षात घेत कारवाईचे संकेत दिले. आमदार समीर कुणावार आणि सुमीत वानखेडे यांनीदेखील शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रशासनाने तातडीने योग्य निर्णय घ्यावा, असे आवाहन केले.शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणाऱ्या आमदार राजेश बकाने यांच्या या ठाम भूमिकेचे उपस्थित शेतकऱ्यांनी स्वागत केले आहे. प्रशासन आणि संबंधित कंपन्यांमध्ये या इशाऱ्यामुळे खळबळ उडाली आहे.



नाचनगाव येथे आर.के.ज्ञान मंदिरम शाळेत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

सेल्फी पॉईंट आणि मनमोहक सजावट ठरली आकर्षणाचा केंद्रबिंदू

पुलगाव । प्रतिनिधी

स्थानिक आर.के. ज्ञान मंदिरम इंग्रजी माध्यम शाळेत शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विशेष समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आर.के. हायस्कूल ट्रस्टचे मुख्य समन्वयक नूरसिंग जाधव, विशेष अतिथी म्हणून अंशिक अनुदानित विभागाचे प्रमुख जितेंद्र वर्मा तर अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य नितीन श्रीवास उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात ज्ञानदेवता माँ सरस्वती आणि ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष स्व. रंगलालजी केजरीवाल यांच्या पूजनाने झाली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांचे टिळक



लावून गुलाब पुष्प, शालेय भेटवस्तू आणि चॉकलेट्स देऊन स्वागत करण्यात आले.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आर.के. ट्रस्टचे मुख्य समन्वयक नूरसिंग जाधव, अंशिक अनुदानित विभाग प्रमुख जितेंद्र वर्मा आणि शाळेचे प्राचार्य नितीन श्रीवास यांनी नवीन शैक्षणिक सत्राच्या शुभेच्छा दिल्या. आर.के. स्कूल समितीचे अध्यक्ष रंजनकुमारजी केजरीवाल यांनीदेखील विद्यार्थ्यांना सत्र २०२५-२६ साठी शुभेच्छा दिल्या.विद्यार्थ्यांच्या आनंदासाठी कला शिक्षक प्रवीण दंडारे आणि सीमा दंडारे यांच्या संकल्पनेतून साकारलेला आकर्षक सेल्फी पॉईंट आणि मोहक सजावट या समारंभाचे विशेष आकर्षण ठरले.हा कार्यक्रम आर.के. स्कूल समितीचे अध्यक्ष रंजनकुमारजी केजरीवाल, आर.के. ट्रस्टचे मुख्य समन्वयक नूरसिंग जाधव, आर.के. हायस्कूलचे उपप्राचार्य गणेश शर्मा आणि अंशिक अनुदानित विभागाचे प्रमुख जितेंद्र वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. सूत्रसंचालन गणित शिक्षिका प्रथा तिवारी यांनी केले तर रूपाली टेटे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या समारंभाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य नितीन श्रीवास, पर्यवेक्षिका प्रीती बिडकर, प्रणिता कोंबे, सांस्कृतिक विभागासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय मदत कक्ष गोरगरीब रुग्णांसाठी आधाराचा नवा अध्याय-मंगेश चिवटे

वर्धा । प्रतिनिधी

वंदनीय बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय मदत कक्ष गोरगरीब रुग्णांसाठी आधाराचा नवा अध्याय आहे, असे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे वैद्यकीय मदत कक्षाचे ओएसडी मंगेश चिवटे यांनी व्यक्त केले.

गोंडप्लाट छत्रपती चौक येथे बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय मदत कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला वर्धा लोकसभा संपर्क प्रमुख राजीव दीक्षित, जिल्हा प्रमुख डॉ. प्रमोद कडू, महिला आघाडी प्रमुख साजिया इनामदार, जिल्हा ग्रामीण प्रमुख जसवंत बहादुरे, सहसंपर्क प्रमुख संजय सतयी, समन्वयक विजय कोल्हे, महिला जिल्हा प्रमुख शुभांगी ठमेकर, उपजिल्हा प्रमुख कवडू उके यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

चिवटे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी, महात्मा फुले जन आरोग्य योजना, प्रधानमंत्री जन आरोग्य (आयुष्यमान) या योजनांचा लाभ रुग्णांना कसा घ्यायचा, कर्करोग, हृदय शस्त्रक्रिया, ब्रेन ट्युमर शस्त्रक्रियेसाठी आर्थिक सहाय्य कसे मिळवायचे, याची सविस्तर माहिती देण्यात आली. या कक्षाच्या



माध्यमातून गोरगरीब रुग्णांना आवश्यक उपचार व मदत मिळवून देण्यासाठी शिवसेना कटीबद्ध आहे.

कार्यक्रमात जिल्ह्यातील सेवाभावी डॉक्टर्स, सामाजिक संस्था व पदाधिकार्यांचा शाल-श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थितांना अल्पोपहार व मिठाईचे वाटप करण्यात आले. या उद्घाटन समारंभास अमरावती, यवतमाळ जिल्ह्यातून मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय मदत कक्ष हा रुग्णांच्या हिताचा महत्त्वाचा उपक्रम आहे असे मत या वेळी मंगेश चिवटे यांनी व्यक्त केले.

शाळा प्रवेशोत्सव सोहळा उत्साहात संपन्न

नवागत विद्यार्थ्यांचे आमदार राजेश बकाने यांच्या हस्ते औक्षण व स्वागत

देवळी । प्रतिनिधी

पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, अडेगाव येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा शाळा प्रवेशोत्सव दिनांक २३ जून २०२५ रोजी उत्साहात पार पडला. या विशेष कार्यक्रमात देवळी-पुलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश बकाने यांच्या शुभहस्ते नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून प्रेमपूर्वक स्वागत करण्यात आले.

या प्रवेशोत्सवात विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकं व गणवेशाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे नव्याने प्रवेश घेतलेल्या चिमुकल्यांचे आनंददायी स्वागत आणि त्यांच्या मनात शिक्षणाबद्दल सकारात्मक वातावरणाची



निर्मिती.कार्यक्रमास पं. स. देवळीच्या गटशिक्षणाधिकारी श्रीमती अश्विनी नेमाडे यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक नरेंद्र गाडेकर, माजी सभापती विद्याताई भुजाडे, राहुल चोपडा, दशरथ भुजाडे, आशिष गांधी आदी मान्यवर आणि गावातील पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाळेतील सर्व शिक्षकवृंदांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मेहनत घेतली. विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी पोशाखात हजेरी लावत विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. पालक आणि शिक्षकांमध्ये स्नेहबंध निर्माण करणारा हा सोहळा अनेकांच्या मनात स्थान करून गेला.शाळा प्रवेशोत्सवाच्या निमित्ताने गावात शिक्षणाविषयी जागरूकता वाढवणे आणि पालकांच्या मनात सकारात्मकता निर्माण करणे, हा शाळेचा महत्त्वपूर्ण प्रयत्न ठरला.


विलासराव वानखेडे यांच्या पासष्टी निमित्ताने ६५ ग्रंथांची भेट

विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजविण्यासाठी स्तुत्य उपक्रम

वर्धा । प्रतिनिधी

३० मे २०२५ रोजी विलासराव वानखेडे यांनी वयाची ६४ वर्षे पूर्ण करत ६५व्या वर्षात पदार्पण केले. या निमित्ताने एक विधायक संकल्प साकार झाला आहे. १७ जून रोजी रोजगार नोकरी संदर्भाचे संपादक व नाथे पब्लिकेशनचे प्रमुख, रोजगार संघाचे अध्यक्ष प्रा. संजय नाथे यांनी वानखेडे यांच्याशी फोनद्वारे संवाद साधून त्यांच्या वाढदिवसानिमित्त आणि नव्या वर्षाच्या पदार्पणाचा संदर्भ घेतला. या संवादातच त्यांनी सुचविले की नुकतेच नाथे प्रकाशनाने प्रकाशित केलेले आयएएस हे पुस्तक ६५ गुणवंत विद्यार्थ्यांना भेट दिल्यास आपला संकल्प अर्थपूर्ण होईल.

वानखेडे यांनी या कल्पनेला तातडीने सहमती दिली आणि लगेचच ६५ पुस्तकांची मागणी केली. दुसऱ्याच दिवशी, १८ जून रोजी, प्रा. संजय नाथे व उद्धव साबळे यांनी बेलगाव ग्रामनिर्माण सभेला जाताना वानखेडे यांच्या निवासस्थानी भेट देत आयएएस पुस्तकाच्या



६५ प्रती सुपूर्द केल्या.यानंतर या पुस्तकांच्या वितरणाचा कार्यक्रम आखण्यात आला. २३ जूनपासून शाळा सुरू होत असल्याने कारंजा शहरातील इयत्ता ८वी ते १२वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांना शाळा प्रारंभदिनी ही पुस्तके भेट म्हणून देण्याचा निर्णय घेण्यात आला. स्थानिक प्रमुख शाळा, महाविद्यालये व कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षकांना या पुस्तकांची सुपूर्दगी करण्यात आली. त्यांनीही या पुस्तकांचे वितरण आनंदाने स्वीकारले आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची हमी दिली.मॉडेल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कस्तुरबा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, इंदिरा कन्या विद्यालय, सनशाईन इंग्लिश स्कूल, गुरुकुल इंग्लिश स्कूल, मॉडेल इंग्लिश स्कूल, स्व. राजीव गांधी मेमोरियल इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय तसेच इतर शाळा आणि बेलगाव येथील शाळांना या पुस्तकांचा समावेश करण्यात आला आहे.गेल्या पाच-सात वर्षांपासून प्रकृतीकडे दुर्लक्ष करून सेवानिवृत्तीनंतरही सत्कार्याचा वारसा जपणाऱ्या विलासराव वानखेडे यांच्या या उपक्रमाचे अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे प्रचारक माणिकदादा बेलूरकर यांनी विशेष कौतुक केले आहे. आद्यग्रामगीताचार्य श्री रामकृष्णदादा बेलूरकर विचार प्रतिष्ठान, नागपूरचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पदवाड, उपाध्यक्ष प्रकाशराव आलवडकर, कार्याध्यक्ष उद्धव साबळे, सचिव गुलाबराव उके, सहसचिव सुरेंद्र बेलूरकर, विश्वस्त गणेशराव शेंडे गुरुजी, सुश्री दुर्गाताई गोमासे, धनविजय सावरकर यांनीही या अभिनव उपक्रमाचे पत्रकाद्वारे अभिनंदन केले आहे.

भारत विद्यालयात आई मुलींच्या हस्ते वृक्षारोपण

'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाचा शाळेत शुभारंभ



हिंगणघाट । प्रतिनिधी

राष्ट्रीय हरित सेनेच्यावतीने शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी भारत विद्यालय, हिंगणघाट येथे माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या 'एक पेड माँ के नाम' या वृक्षारोपणाच्या चळवळीचा शुभारंभ करण्यात आला. या निमित्ताने शाळेतील इयत्ता पाचवी व सहावीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते त्यांच्या मातांसह वृक्षारोपण करण्यात आले.

यामध्ये विद्यार्थिनी उन्नती कृष्णाजी महाजन हिने आई भाग्यश्री महाजन यांच्या हस्ते, आराध्या हेमंत भोयर हिने आई मनीषा भोयर यांच्या हस्ते, तर पूर्वाई निलेश कामडी हिने आई निकिता कामडी यांच्या हस्ते वृक्षारोपण केले. पालकांनी या उपक्रमात उत्साहाने सहभागी होत आपली भूमिका निभावली.इको क्लब फॉर मिशन अंतर्गत वृक्षारोपणानंतर लगेचच विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे शाळेचे मुख्याध्यापक हरिश भट्टड यांच्या हस्ते वितरित करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून 'एक विद्यार्थी-एक झाड' या उपक्रमाचा प्रारंभ करण्यात आला आहे. गतवर्षीप्रमाणेच यंदाही शाळेचा पहिला दिवस निवडक विद्यार्थ्यांना देशी वृक्षांची रोपे वाटून साजरा करण्यात आला, तसेच त्यांच्या संगोपनाबद्दल सूचना देण्यात आल्या. प्रत्येक विद्यार्थिनीने आपल्या आईसह आपल्या परिसरात वृक्ष लावावा आणि आपल्या वाढदिवसासोबतच या झाडाचा वाढदिवस साजरा करावा, असे आवाहन राष्ट्रीय हरित सेनेचे दत्ता भांगे यांनी केले.यावेळी शालेय परिसरात राज्य वृक्ष जारूळ, ताम्हण इत्यादी वृक्षांची लागवड करण्यात आली. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक हरिश भट्टड, उपमुख्याध्यापक किशोर चवरे, पर्यवेक्षिका निलाक्षी बुरीले, मनीषा कोंडावार, पालक प्रतिनिधी निलेश माथनकर, सीमा नव्हाते, राष्ट्रीय हरित सेनेचे दत्ता भांगे, निखारे, योगेश तिवारी, अमित महाजन, सचिन धारकर, विकास नागरकर, बालाजी आसुटकर तसेच विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारत विद्यालयात शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत, पाठ्यपुस्तकांचे वाटप



हिंगणघाट । प्रतिनिधी

शासनाच्या निर्देशानुसार भारत विद्यालयात इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा पहिला दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मुलांच्या स्वागतासाठी शाळेच्या प्रवेशद्वारावर रांगोळ्या काढण्यात आल्या, फुलांच्या तोरणासह आंब्याच्या पानांची तोरणे लावून प्रवेशद्वार सुशोभित करण्यात आले होते. फुगे व फुलांच्या साहाय्याने शाळेचा परिसर सजविण्यात आला होता.

इयत्ता ५ वी व ६ वीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत बँड पथकासह ढोल-ताशांच्या गजरात प्रभातफेरी काढून करण्यात आले. शाळेच्या प्रवेशद्वारावरच विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले, तर शाळेत पहिले पाऊल ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांचे तिलक लावून गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक हरिश भट्टड, उपमुख्याध्यापक किशोर चवरे, पर्यवेक्षिका निलाक्षी बुरीले, पर्यवेक्षिका मनीषा कोंडावार, पालक प्रतिनिधी निलेश माथनकर, सीमा नव्हाते यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत केले.नवीन गणवेश, नवे दप्तर आणि नव्या वह्या-पुस्तकांसह विद्यार्थी सोमवारपासून शाळेत दाखल झाले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या निमित्ताने मुख्याध्यापक हरिश भट्टड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शाळेची सविस्तर माहिती दिली आणि नव्या उपक्रमांचा शुभारंभ केला. ग्रंथपाल विकास नागरकर यांनी शिक्षक-शिक्षिकांच्या सहकार्याने समग्र शिक्षा अभियानांतर्गत इयत्ता ५ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप केले.दिर्घ सुट्टीनंतर पुन्हा शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. जुने मित्र-मैत्रिणी भेटल्याचा आनंद, किलबिलाट, नवीन चेहऱ्यांची उत्सुकता आणि शिक्षकांना भेटण्याची घाई अशा आनंददायी वातावरणामुळे शाळेचा पहिला दिवस अविस्मरणीय ठरला. सारा आसमंत जणू धरतीवर अवतरलेला असल्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होता. पालकदेखील आपल्या पाल्यांना शाळेत सोडण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निकिता कामडी यांनी तर आभार प्रदर्शन उपमुख्याध्यापक किशोर चवरे यांनी केले. पालकांसाठी चहापानाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. अशा आनंददायी वातावरणात शाळेचा पहिला दिवस उत्साहात साजरा झाला.

शरीर निरोगी राहिले तरच मन निरोगी राहते-कविता जोशी



आर्वी । प्रतिनिधी

दिनांक २१ जून २०२५ रोजी योग दिनानिमित्त परमहंस श्री आडकोजी महाराज जन्मभूमी संस्थान, पारसे भवन येथे महिलांच्या उत्साहात योग दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने महिलांनी सहभाग घेत लयबद्ध पद्धतीने योग व प्राणायामाचा आनंद लुटला.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रशिक्षक शिरभाते यांनी लयबद्ध गणपती स्तोत्र म्हणून कार्यक्रमास प्रारंभ केला. या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी शुभदा प्रशांत सव्वालाखे तर प्रमुख पाहुणे म्हणून रुपाली श्रीकांत मुने उपस्थित होत्या. मार्गदर्शक म्हणून कविता अनिल जोशी यांनी आपले विचार व्यक्त केले.पाहुण्यांचे स्वागत साधना पेंडके, माधुरी पारसे आणि शुभांगी पारसे यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. कार्यक्रमात महिलांनी विविध योगासने व प्राणायामाचा सराव अतिशय उत्साहात पार पाडला. काही महिलांनी आपला व्यक्तिगत अनुभव सांगून योगामुळे त्यांच्या जीवनात घडलेल्या सकारात्मक बदलांची माहिती दिली.मार्गदर्शन करताना सौ. कविता जोशी म्हणाल्या, शरीर निरोगी राहिले तरच मन निरोगी राहते, मन निरोगी राहिले तरच गाव निरोगी राहते, गाव निरोगी राहिले तरच घर निरोगी राहते आणि हे साध्य करण्यासाठी नियमित योग करणे गरजेचे आहे. त्यांच्या या मौलिक सल्ल्याचे सर्व उपस्थित महिलांनी स्वागत केले.अध्यक्ष सौ. सव्वालाखे यांनी महिलांचे कौतुक करत सांगितले की, नियमित योगाभ्यास हा उत्तम आरोग्यासाठी अतिशय महत्त्वाचा आहे. रुपाली मुने यांनीही महिलांना नियमित योग करण्याचे आवाहन केले.प्रशिक्षक राजूरकर आणि शिरभाते यांनी उत्कृष्टरीत्या योगाचा सराव करून घेतला. त्यांचा सन्मान पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वृंदा विजय दामले यांनी तर समारोपाच्या वेळी माधुरी पारसे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचा समारोप सामूहिक रीत्या वंदे मातरम या जयघोषासह करण्यात आला.कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या सर्व महिलांचे आयोजकांतर्फे विशेष आभार मानण्यात आले.

दैनिक
सह्याद्रीचा राखणदार





शिवगर्जनेने शाळेत बालकांचे पहिले पाऊल

विद्यार्थी घडले तरच देश घडेल–जिल्हाधिकारी विनय गौडा

समारंभातील खास क्षण

- नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे सजवलेल्या इनोव्हातून आगमन
- जिल्हाधिकारी विनय गौडा यांची विद्यार्थ्यांशी संवाद साधून हितगुज
- लेझीम व बँडच्या ठेक्यावर विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत
- जिल्हाधिकार्यांच्या हस्ते शाळेच्या परिसरात वृक्षारोपण
- फीत कापून व दीपप्रज्वलनाने शैक्षणिक सत्राचा शुभारंभ
- शिवगर्जनेत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव
- नवीन बालकांच्या प्रवेशाच्या पाऊलखुणा रेखाटण्याचा कार्यक्रम
- विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत
- जिल्हाधिकार्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय बॅग, पुस्तके आणि गणवेशाचे वाटप

शाळेचा परिचय

दाताळा येथील पी.एम.श्री. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत एकूण २२५ विद्यार्थी शिकत असून नवीन शैक्षणिक सत्रात २५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. शाळेत मुला–मुलींकरिता स्वतंत्र व स्वच्छ शौचालये, दोन आर.ओ. पाणी यंत्रणा, सात स्मार्ट टीव्हीसह सुसज्ज वर्गखोल्या, विज्ञान प्रयोगशाळा, डढएच् लॅब, बगीचा आणि इतर सुविधांची व्यवस्था आहे.समारंभाचे संचालन वंदना वनकर यांनी तर आभार प्रदर्शन राजू लांजेकर यांनी केले.

चंद्रपूर (आशिष घुमे) : 'महाराज, राजनीती धुरंधर, प्रौढप्रताप पुरंदर, सिंहासनाधिश्वर, महाराजाधिराज, राजा शिवछत्रपती महाराजांचा, विजय असोविजय असोविजय असो' अशा पहाडी आवाजात ७ वी ची विद्यार्थिनी कार्तिकी मुंगले हिने शिवगर्जनेचा जयघोष केला आणि दाताळा येथील पी.एम.श्री. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव थाटात साजरा करण्यात आला.जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या समारंभास शिक्षणाधिकारी (प्राथ.) अश्विनी सोनवणे, दाताळ्याच्या सरपंच सुनीता देशकर, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष सुमन दोनाडकर, शिक्षण विस्तार अधिकारी मनोज गौरकार, शाळेचे मुख्याध्यापक लटोरी मोहितकर, शिक्षिका सुनिता पावडे, वंदना वनकर, अर्चना चिंतावार, शिक्षक राजू लांजेकर, केशर चकोले यांच्यासह पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





विद्यार्थी घडले तरच देश घडेल

जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत म्हटले की, आजपासूनच २०२५–२६ या शैक्षणिक सत्राची सुरुवात झाली आहे. पहिल्यांदा शाळेत पाऊल टाकण्याचा क्षण अविस्मरणीय आहे. शिक्षणामुळेच व्यक्तीचा, कुटुंबाचा, सामाजिक व आर्थिक विकास साध्य होतो. कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, हेच शासनाचे उद्दिष्ट आहे. स्पर्धेच्या या काळात विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, जेणेकरून आपला विद्यार्थी भविष्यात मोठ्या पदावर पोहोचेल. विद्यार्थी घडले तरच देश घडेल या भावनेने जिल्हा प्रशासन शाळांच्या विकासासाठी निधीची कमतरता राहू देणार नाही, असे त्यांनी सांगून पालकांना मुलांना चांगले शिक्षण देण्याचे आवाहन केले.



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत अभ्यास केंद्रांना येणाऱ्या अडचणी संदर्भात विद्यार्थी सेवा मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश देशमुख (नाशिक) यांच्याशी नागपूर येथे चर्चा करताना विवेकानंद ज्ञानपीठ वरोरा चे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान. यावेळी नागपूर विभागाचे वरिष्ठ सल्लागार डॉ धनंजय वेळूकर, डॉ.पांडुरंग डांगे, केंद्र संयोजक डॉ. यशवंत घुमे उपस्थित होते. यावेळी प्रा.देशमुख, डॉ. वेळूकर यांनी अडचणी समजून घेत सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

जागतिक योग दिन : 'एक पृथ्वी, एक आरोग्य' या थीमवर आनंद निकेतन महाविद्यालयात साजरा

वरोरा । प्रतिनिधी

जागतिक योग दिनानिमित्त या वर्षीची 'एक पृथ्वी, एक आरोग्य' ही थीम मानवी कल्याण आणि पर्यावरणीय सुसंवादाचा मेळ साधणारी आहे. व्यक्तिगत शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्यासाठी योगाभ्यास जितका महत्त्वाचा आहे, तितकाच पर्यावरणाचा समतोल राखणेही काळाची गरज आहे. स्वस्थ पर्यावरण म्हणजेच स्वस्थ आम्ही असा प्रण घेत आनंद निकेतन महाविद्यालयात ११ वा जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात नागपूरमधील ३ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन एनसीसी युनिट, वर्ध्यातील २१ महाराष्ट्र बटालियन एनसीसी युनिटचे छात्र सैनिक, एनएसएस विभागाचे स्वयंसेवक, स्पोर्ट्स विभागाचे खेळाडू, आनंद निकेतन महाविद्यालयातील विद्यार्थी व वरोऱ्यातील नागरिक अशा सुमारे १६० जणांनी सहभागी होत सामूहिक योगाभ्यास केला. आनंदवनचे योग शिक्षक श्री. दीपक शिवसर यांनी उपस्थितांना विविध योगासने व प्राणायामाचा सराव घडवून आणला.



महाविद्यालयाच्या उपप्राचार्य राधा सावाने यांनी उपस्थितांना योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. स्वस्थ आणि समतोल जीवनासाठी योग आपल्या दैनंदिन जीवनाचा हिस्सा करायला हवा, असा संदेश त्यांनी दिला. या वेळी रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. शौकत शाह, लेफ्टनंट लता वा. अत्राम (३ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन एनसीसी नागपूर), लेफ्टनंट संदीप पारखी (२१ महाराष्ट्र बटालियन एनसीसी वर्धा), एनएसएस विभागप्रमुख प्रा. राठोड, आनंद माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका टोंगे, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शारीरिक शिक्षण विभागप्रमुख प्रा. तानाजी बायस्कर यांनी केले.

शाळा प्रवेशोत्सवाने चिंचाळा शाळा गजबजली!

आमदार सुधाकर अडबाले यांच्या सजवलेल्या कारने लहानग्यांच्या स्वागताचा क्षण अविस्मरणीय





चंद्रपूर । प्रतिनिधी

तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक आदर्श शाळा चिंचाळा येथे सोमवार, २३ जून २०२५ रोजी शाळा प्रवेशोत्सवाचा जंगी कार्यक्रम पार पडला. नव्याने शाळेचे दार ओलांडणाऱ्या लहानग्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत होता. विशेष म्हणजे या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आमदार सुधाकर अडबाले यांनी खास सजवलेली कारच आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. या सुंदर वाहनातून लहानग्यांना शाळेपर्यंत आणण्यात आले, ज्यामुळे परिसरात जणू जत्रेचेच वातावरण निर्माण झाले.सकाळी ८ वाजता शाळा प्रवेश दिंडीने कार्यक्रमाचा श्रीगणेशा झाला. पारंपरिक वाद्यांच्या गजरात गावाच्या रस्त्यांतून निघालेल्या या दिंडीने स्थानिक विद्यार्थ्यांतच नव्हे तर पालकांतही उत्साहाची लहर पसरवली. त्यानंतर सकाळी ९ वाजता मुख्य समारंभास प्रारंभ झाला.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी नागपूर शिक्षक मतदारसंघाचे विधान परिषद सदस्य आमदार सुधाकर अडबाले होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, पाठ्यपुस्तकं, बूट आणि सॉक्सचे वितरण करण्यात आले.या विशेष समारंभास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर मीना साळुंखे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) राजेश पातळे, सरपंच शोभाताई चिमुरकर, शाळेचे मुख्याध्यापक नामदेव आस्वले, केंद्रप्रमुख फुलझेले, ग्रामपंचायत सदस्य प्रकाश शेंडे, आदर्श शिक्षक दुर्योधन, बाबाराव माशिरकर, सचिव सुधाकर वासेकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुधीर जुनघरी, पोलिस पाटील प्रवीण बोडेकर आणि इतर शिक्षकवृंद उपस्थित होते.विद्यार्थ्यांच्या पहिल्या दिवसाचा आनंद साजरा करण्यासाठी आयोजित केलेल्या या समारंभाने शाळेप्रति आपुलकी आणि शिक्षणाविषयी आदरभाव वाढवला. या सुंदर आयोजनाबद्दल आमदार सुधाकर अडबाले यांनी शाळा व्यवस्थापनाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी अशा कार्यक्रमांची गरज आहे. शाळेचा पहिला दिवस म्हणजेच भविष्यात घडविण्याचा पहिला टप्पा आहे,असे त्यांनी सांगत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.चिंचाळ्यात साजऱ्या झालेल्या या शाळा प्रवेशोत्सवाने विद्यार्थी, पालक आणि शिक्षकवर्गाच्या मनात दीर्घकाळ टिकणाऱ्या आठवणींचे स्थान मिळवले आहे.

ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना आता प्रतिमाह ५ हजार रुपये मानधन

राजर्षी शाहू महाराज मानधन योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

चंद्रपूर । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजनेत' महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत. या योजनेअंतर्गत ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना देण्यात येणारे मानधन ५ हजार रुपये प्रतिमाह इतके वाढविण्यात आले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील पात्र साहित्यिक व कलाकारांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी १ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत आपले अर्ज ऑनलाईन सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले आहे.

योजनेचा उद्देश : ज्या ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांचे जीवनमान केवळ कलेवर किंवा साहित्यावर अवलंबून आहे आणि ज्यांना उतारवयात आर्थिक अडचण भासत आहे, त्यांना या योजनेद्वारे आर्थिक सहाय्य करून त्यांच्या कलेचा सन्मान करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

पात्रतेचे निकष: अर्जदाराचे वय ५० वर्षापेक्षा जास्त असावे. (विधवा/परित्यक्ता/दिव्यांग अर्जदारांसाठी वयोमर्यादा ४० वर्षे आहे.) कला किंवा साहित्य क्षेत्रात किमान १५वर्षांचे योगदान आवश्यक. अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ६० हजार रुपयांपेक्षा कमी असावे. अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असावा. अर्जदार केंद्र किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही पेन्शन योजनेचा लाभार्थी नसावा व त्याचा उदरनिर्वाह केवळ कला/साहित्यावर अवलंबून असावा. **अर्ज करण्याची पद्धत :** १ जुलै ३१ जुलै २०२५ या कालावधीत फक्त ऑनलाईन पद्धतीने https://aaplesarkar.mahaonline.gov.in/en या संकेतस्थळावर अर्ज स्वीकारले जातील. अर्जदार जवळच्या सेतू केंद्रावर किंवा इतर उपलब्ध माहिती तंत्रज्ञान प्रणालीद्वारे अर्ज सादर करू शकतात.

आवश्यक कागदपत्रे : वयाचा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला, जन्म प्रमाणपत्र इ.), आधार कार्ड, तहसीलदार यांनी दिलेला चालू वर्षाचा उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला (डोमिसाईल सर्टिफिकेट), अर्जदाराचा व लागू असल्यास जोडीदाराचा फोटो, बँक पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत (IFSC कोडसह), कला/साहित्य क्षेत्रातील योगदानाचा पुरावा (उदा. प्रमाणपत्रे, पुरस्कार, बातमीपत्रांतील कात्रणे इ.), इतर शासकीय योजनांचा लाभ घेत नसल्याबाबतचे नोटरी केलेले प्रमाणपत्र, सांस्कृतिक संस्थांचे शिफारसपत्र असल्यास, केंद्र शासनाचा / राज्य शासनाचा / सांस्कृतिक मंत्रालयाच्या पुरस्काराचे प्रमाणपत्र असल्यास, साहित्य अकादमी यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमातील सहभागाचे पुरावे असल्यास, नामांकित संस्था / व्यक्तीचे शिफारस पत्र असल्यास, अर्जदार दिव्यांग असल्यास दिव्यांग प्रमाणपत्र. चंद्रपूर जिल्हातील सर्व पात्र ज्येष्ठ साहित्यिक आणि कलाकारांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित मुदतीत आपले अर्ज ऑनलाईन सादर करावेत. अधिक माहितीसाठी आपल्या तालुक्यातील पंचायत समितीशी संपर्क साधावा, असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) मिना साळूंके यांनी कळविले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .